शासन ज्ञापन, क्रमांक-जमीन-२६०४/३२९४/प्र.क्र. २०२३/ज-३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक ४ जून, २००७

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे तुर्भे, नभूक्र २ पै व ५ पै खाडीपैकी जमीन जहाज दुरुस्ती व माल हाताळणी इत्यादी सुविधा निर्माण करण्यास योगायतन पोर्टस प्रा. लि. यांना देण्यासाठी जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना देण्याबाबत...

शासन ज्ञापन :-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक- ४४/ ३ डी/कावि-२८७/०४, दिनांक २३/८/२००४ ला अनुलक्षून असे विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे तुर्भे, न.भू.क्र. २ येथील २३,२९९ चौ. मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हजविरहित वितरणासाठी उपलब्ध असलेली जमीन, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्तीकरीता, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची शिघ्रसिध्द गणकानुसार येणा-या प्रचलित बाजारभावाच्या एकूण रकमेवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तीत्वात असलेल्या प्राईम लेंडींग रेटप्रमाणे होणा-या रकमेइतके प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने, नेहमीच्या अटी व शर्तीवर आणि जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना आवश्यक वाटतील अशा अटी व शर्तीवर तसेच खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीवर, देण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

अटी १) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे हस्तांतरीत करावयाच्या जमिनीचा वापर जहाज बांधणी व दुरुस्ती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने केलेल्या करारनाम्यामधील अटी/शर्तीनुसार प्रयोजनासाठी करण्यात यावा, इतर प्रयोजनासाठी सदर जमीन वापरता येणार नाही.

२) मंजूर जमिनीबाबत केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी दिनांक १९/१/२००१ रोजी मंजूर केलेल्या किनारा व्यवस्थापन आराखड्यानुसार कुठल्याही अटींचा भंग होणार नाही, याची काळजी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने घ्यावी.

३) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून सदर जमीन मे. योगायतन पोर्टस प्रा. लि. या कंपनीस देण्यात येणार आहे. सदर कंपनीकडून नियोजित प्रकल्पाची उभारणी करतांना कंपनीच्या प्रत्यक्षात ताब्यात दिलेल्या जमिनीवर किंवा सभोवतालच्या जमिनीवर असलेल्या मॅन्ग्रोव्हजची तोड केली जाणार नाही.

४) कंपनीकडून वरीलप्रमाणे अटीचा भंग झाला तर कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

५) कंपनीस देण्यात येणा-या जमिनी सभोवतालच्या मॅन्ग्रोव्हजचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी देखील कंपनीची राहील व व तसे कंपनीकडून Undertaking घेण्यात येईल.

ⓐ जिल्हाधिकारी

६) महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने, गृह विभागाने पारीत केलेले आदेश क्रमांक-जेईटी-१३०३/प्र.क्र. १६३/बंदरे-२, दिनांक १९ ऑगस्ट, २००५ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

२. हे शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४०१/(अ)/व्यय-९, दिनांक २१/४/२००६ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. सि. वखारे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा, मुंबई
६) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) वित्त विभाग, कार्यासन, व्यय-९, मंत्रालय, मुंबई
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, ३ रा मजला, १४, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ०३८.
१०) संचालक, योगायतन ग्रुप ऑफ कंपनीज, वासवानी मॅंशन, १२०, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
११) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

शासन शुध्दीपत्रक, क्रमांक- जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २८ ऑगस्ट, २००७

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा

मौजे तुर्भे, नभूक्र २ पै व ५ पै खाडीपैकी जमीन जहाज दुरुस्ती व माल हाताळणी इत्यादी सुविधा निर्माण करण्यास योगायतन पोर्टस प्रा. लि. यांना देण्यासाठी जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना देण्याबाबत...

पहा :- शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३, दिनांक ४ जून, २००७

शासन शुध्दीपत्रक :-

मौजे तुर्भे, नभूक्र २ पै व ५ पै खाडीपैकी जमीन जहाज दुरुस्ती व माल हाताळणी इत्यादी सुविधा निर्माण करण्यास योगायतन पोर्टस प्रा. लि. यांना देण्यासाठी जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना देण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक जमीन-२६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३, दिनांक ४ जून, २००७ मधील परिच्छेद १ मध्ये ओळ क्रमांक-८ मधील "१० वर्षाच्या भाडेपट्टयाने" ऐवजी "३० वर्षाच्या भाडेपट्टयाने" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. सि. वळारे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.
५) अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा, मुंबई
६) महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) वित्त विभाग, कार्यासन, व्यय-९, मंत्रालय, मुंबई

C:\VILAS DHAIJE\G R/40

WS-126

21636

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


(247)

क्रमांक :- सी/कार्या-३डी/एल-६४०
दिनांक :- /२/२००८
4 FEB 2008

वाचले : १) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन- २६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.४/६/२००७
२) शासन महसूल व वन विभागाकडील शुध्दीपत्रक जमीन- २६०४/१२९४/प्र.क्र. २०२३/ज-३ दि.२८/८/२००७

आदेश :

मौजे तुर्भे, न.भू.क्र. २पै येथील २३२९९ चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हजविरहित वितरणासाठी उपलब्ध असलेली जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्ती करीता महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ नुसार प्रचलित दराप्रमाणे (दि.२९/५/२००६ च्या शासन निर्णयानुसार शिघ्रसिध्द गणकानुसार येणारा २००७ चा दर) येणाऱ्या किंमतीवर प्राईम लॅण्डींग रेट प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन अटी/शर्तीवर १० वर्षाकरीता भाडेपट्ट्याने मंजूर करणेंस शासनाने परवानगी दिली होती. परंतु, शासन शुध्दिपत्रक दि.२८/८/२००७ अन्वये भाडेपट्ट्याची मुदत १० वर्षांएवजी ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने मंजूर करणेंस परवानगी दिली आहे.

प्रकरणी नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांचेकडून मंजूर जमिनीची मोजणी करुन त्यातील किती मॅन्ग्रोव्हजविरहित जमीन वितरणासाठी उपलब्ध होईल याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करणेंबाबत कळविणेंत आले असता, नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांनी त्यांचेकडील दि.२९/९/२००७ चे पत्रान्वये जागेवर तिवराची(मॅन्ग्रोव्हज) झाडे नाहीत तसेच जागेचे एकूण क्षेत्र २३२९९.०० चौ.मी. क्षेत्र मोकळे असल्याबाबतचा अहवाल सादर केला आहे.

सबब महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्ती करीता मौजे तुर्भे, न.भू.क्र. २पै येथील २३२९९ चौ.मी. जमिनीपैकी मॅन्ग्रोव्हजविरहित वितरणासाठी उपलब्ध असलेली जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्ती करीता महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ नुसार प्रश्नांकीत जमीन ना विकास विभागात येत असल्याने शिघ्र सिध्द गणकातील तरतूदीनुसार प्रश्नांकीत जमिनीचा सन २००७ चा बाजारभाव रु. ५०८०/- च्या ३३% रक्कम रु.१६७६/- इतक्या बाजार मुल्यावर

दि.१/४/२००७ रोजीच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्राईम लॅण्डींग रेट ११.५०% प्रमाणे वार्षिक रु.४५,६५,२४३/- इतके भुईभाडे आकारुन शासन ज्ञापन दि.२७/८/२००७ चे अधिन राहून खालील अटी/शर्तीवर ३० वर्षांचे कालावधीकरीता जहाज दुरुस्ती या प्रयोजनाकरीता भाडेपट्ट्याने मंजुर करण्यांत येत आहे.

सदरची वार्षिक भाडेपट्टा रक्कम आगाऊ या कार्यालयात जमा करावी.

**अटी :**

१) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे हस्तांतरीत करावयाच्या जमिनीचा वापर जहाज बांधणी व दुरुस्ती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने केलेल्या करारनाम्यातील अटी/शर्तीनुसार प्रयोजनासाठी करण्यांत यावा. इतर प्रयोजनासाठी सदर जमीन वापरता येणार नाही.

२) मंजुर जमिनीबाबत केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी दि.१९/१/२००१ रोजी मंजूर केलेल्या किनारा व्यवस्थापन आराखड्यानुसार कुठल्याही अटींचा भंग होणार नाही, याची काळजी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने घ्यावी.

३) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून सदर जमीन मे. योगायतन पोर्टस प्रा.लि. या कंपनीस देण्यांत येणार आहे. सदर कंपनीकडून नियोजित प्रकल्पाची उभारणी करतांना कंपनीच्या प्रत्यक्षात ताब्यात दिलेल्या जमिनीवर किंवा सभोवतालच्या जमिनीवर असलेल्या मॅन्ग्रोव्हची तोड केली जाणार नाही.

४) कंपनीकडून वरीलप्रमाणे अटीचा भंग झाला तर कंपनीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत येईल.

५) कंपनीस देण्यांत येणाऱ्या जमिनी सभोवतालच्या मॅन्ग्रोव्हजचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी देखील कंपनीची राहील व तसे कंपनीकडून Undertaking घेण्यांत येईल.

६) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने, गृह विभागाने पारीत केलेले आदेश क्रमांक जेईटी-१३०३/प्र.क्र. १६३/बंदरे-२, दिनांक १९ ऑगस्ट, २००५ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

७) सदरची जमीन ना विकास विभागात येत असल्यामुळे सिध्द शिघ्र गणकातील तरतूदीनुसार जमीनीचे तात्पुरते मुल्यांकन चालु बाजारमुल्याच्या ३३% एवढे गृहित धरुन भाडेपट्ट्याची आकारणी करणेंत आली आहे. प्रकरणी शासनाकडून संपुर्ण बाजार मुल्याचे रक्कमेप्रमाणे भाडेपट्टा आकारणेंबाबत आदेशित झालेस भाडेपट्टेदार यांना त्याप्रमाणे अंतिम भाडेपट्ट्याची रक्कम भरणां करणें बंधनकारक राहील.

८) भुईभाड्याच्या दरात दर १० वर्षांनी सुधारणां करण्यांत येईल.

९) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड सदरची जागा मे. योगायतन पोर्टस् प्रा.लि. कंपनीस हस्तांतरण करणार असल्याने त्यांचे व मे. योगायत पोर्टस् प्रा.लि. यांमधील करारनाम्याच्या अटी व शर्तीची एक प्रत या कार्यालयास सादर करावी. तसेच, भाडेपट्ट्याची रक्कम व वेळोवेळी सुधारीत होणारे भाडे मे. योगायतन पोर्टस् या कार्यालयास भरणा करेल असे हमीपत्रसुध्दा घ्यावे.

१०) भविष्यात शासन/जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तीचा समावेश करण्याचा हक्क राखून ठेवणेंत येत आहे. सदरच्या अटी/शर्ती भाडेपट्टाधारक/संस्थेवर बंधनकारक राहील.

११) सदर जागा भाडेपट्टेधारक संस्था यांनी इतर कोणतीही व्यक्ती/संस्था यांना विक्री/हस्तांतर अथवा गहाण ठेऊ नये. तसे आढळल्यास शर्तभंग केल्याचे समजून जागा शासनजमा करण्यांत येईल.

१२) वरीलपैकी कोणत्याही अटी/शर्तीचा भंग केल्यास संस्थेस कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता भाडेपट्टा रद्द करुन जमिनीचा ताबा परत घेण्यांत येईल.

१३) शासनास/जिल्हाधिकाऱ्यास कधीही जमिनीची आवश्यकता भासल्यास जमीन संस्थेकडून कोणतीही नुकसान भरपाई मोबदला न देता काढून घेण्यांत येईल व त्यास संस्था आक्षेप घेणार नाही.

१४) भाडेपट्टेदार यांना शासन/जिल्हाधिकारी यांचेसोबत प्राथमिक स्वरुपाचा करारनामा करावा लागेल. सदरचा करारनामा मुद्रांक शुल्क भरुन नोंदणी केल्याशिवाय जमिनीचा ताबा देण्यांत येणार नाही.

१५) वरील सर्व अटी/शर्ती मान्य असल्याचे रु. २२०/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सात दिवसात सादर करावे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स,
३रा मजला, १४, रामजी भाई कमानी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ०३८

प्रत :- १) मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसुल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन दि. ४/६/२००७ व शुध्दिपत्रक दि.२८/८/२००७ चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.

२) संचालक, योगायतन ग्रुप ऑफ कंपनीज, वासवानी मँशन, १२० दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०

L-637-1-sns

३) तहसिलदार, कुर्ला यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

४) नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

२/- त्यांनी भाडेपट्ट्याची रक्कम भरलेबाबत तसेच प्राथमिक स्वरुपाचा भाडेपट्टा करारनामा झालेनंतर तो नोंदणी झाल्याची खात्री करुन संस्थेस जमीनीचा ताबा द्यावा व ताबा दिल्यानंतर जमिनीचा नकाशा व ताबा पावती तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावी.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

COLLECTOR OF BOMBAY SUBURBAN DIST.

Issued
06/02/08

For, Yogayatan Parts Pvt Ltd.
Received on 6/2/08.